IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# मराठी साहित्याचे बदलते अभिव्यक्ती माध्यम : संशोधन साहित्याचा आढावा

डॉ. पल्लवी सत्यवान ताजने

आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा

संशोधन केंद्र-लोकमान्य महाविद्यालय ,वरोरा

**प्रस्तावना -**

मानवी वृत्तीनुसार मनातील विचार भावभावना व्यक्त करणे म्हणजे अभिव्यक्ती होय. आपल्या अंगी असलेले गुण किंवा विचार, ज्ञान, कला कुठल्याही माध्यमातून समोरच्यापर्यंत पोहोचविणे यालाच अभिव्यक्ती म्हणतात. मनुष्य जेव्हा आपल्या भावभावनांना शब्दरूप देतो तेव्हा साहित्य निर्माण होते, हीच वाङ्मयीन अथवा साहित्यिक अभिव्यक्ती होय. शब्द मूर्त असतात विरून जातात म्हणून साहित्यिक अभिव्यक्ती अमूर्त राहण्यासाठी होण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग होऊ लागला. सुरुवातीला 'जे जे वाणीमय ते ते वाङ्‌मय' असे हे वाङ्‌मय वाणीवरच खेळते ठेवल्या गेले. म्हणजे ते पाठ केल्या गेले. मौखिक स्वरूपात असलेले हे मराठी साहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे असेच हस्तांतरित होत गेले. पुढे लिपी आणि लिखाणाच्या साधने विकसित झाल्याने ते हस्तलिखित स्वरूपात समोर आले. हस्तलिखित स्वरूपात मराठी साहित्याचे संवर्धन झाले असे आपणास म्हणता येईल. या माध्यमातून साहित्याला अमूर्त रूप प्राप्त झाले. प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील सर्व मराठी साहित्य (संत, पंत, तंत )आपणास याच हस्तलिखित स्वरूपात दिसतात.

मुद्रणाचा शोध लागल्यावर मराठी साहित्याच्या सार्वत्रिकतेच्या दृष्टीने मोठी क्रांती झाली. मराठी साहित्य हे मुद्रित माध्यमातून म्हणजे पुस्तके,वृतपत्रे, नियतकालिके आणि मासिके इत्यादींच्या माध्यमातून मराठी साहित्यिक अभिव्यक्ती होऊ लागली. मुद्रित माध्यमाने अनेक वाचकांची साहित्यिक अभिरुची वाढविली आणि अनेक नवे लेखक लिहिते होऊ लागले. या अभिव्यक्तीमुळे पुढे मराठी साहित्याच्या प्रकारातही भर पडत गेली. इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या उदयाने पुढील काळात मराठी साहित्य लिखित स्वरूपातून सादरीकरणाच्या स्वरूपात आपल्यासमोर आले आणि सर्वत्रिक झाले. दृकश्राव्य स्वरूपात ते ग्रामीणातील ग्रामीण भागातही पोहोचले, यातून मराठी साहित्य लोकाभिमुख झाले. या माध्यमातून सामान्यातल्या सामान्य लोकांमध्येही साहित्य अभिरुची निर्माण झाली.

दृक-श्राव्य माध्यमाच्या पुढे जाऊन झालेल्या डिजिटल क्रांतीने मराठी साहित्याचे माध्यम पुन्हा एका वेगळ्या मंचावर परावर्तित झाले आणि मराठी साहित्याची दशा आणि दिशा बदलली. मराठी साहित्याच्या या नव्या मंचाचा त्यावरील साहित्य अभिव्यक्तीचा आढावा घेणे साहित्याच्या सकसतेसाठी माध्यमांवर शास्त्रीय संशोधन करणे गरजेचे

आहे.साहित्याच्या अभिव्यक्तीच्या दृष्टीने आणि त्याच्या विकासाच्या दृष्टीने नवे माध्यम कसे कार्य करीत आहे हे जाणून घेणे शक्य होईल,ज्यातून भविष्यात योग्य ती पावले साहित्याच्या दृष्टीने उचलता येतील.

**बीजशब्द -** सोशल मीडिया,साहित्य, मराठी साहित्य ,साहित्य अभिव्यक्ती,माध्यमे ,अभिव्यक्ती माध्यमे

**संशोधन साहित्याचा आढावा**

मराठी साहित्याच्या अभिव्यक्ती माध्यमावरील संशोधन साहित्याचे पुनरावलोकन करताना दोन प्रमुख प्रवाह दिसतात: पारंपारिक अभिव्यक्ती माध्यम (लिखित, तोंडी, दृक-श्राव्य) आणि आधुनिक डिजिटल व भाषा तंत्रज्ञानाशी संबंधित माध्यम.

- **मौखिक ,लिखित आणि दृक-श्राव्य माध्यमे** : संशोधन पुनरावलोकन सांगते की मराठी साहित्य पूर्वी, मौखिक ,हस्तलिखित, पुस्तक, कथा, कविता, कादंबऱ्या, नाटक, पोवाडे, लोकगीत, लोककथा, इत्यादी माध्यमांतून अभिव्यक्त होत आले आहे. नंतर मुद्रण व दृक-श्राव्य माध्यम (प्रसारमाध्यमे) उपलब्ध झाल्याने या अभिव्यक्तीचे स्वरूप बदलले.
- **दृक-श्राव्य आणि डिजिटल माध्यमे :** दूरदर्शन, रेडिओ, सिनेमा, इंटरनेट, सोशल मीडिया यांद्वारे मराठी साहित्य नवे स्वरूप घेते आहे.

प्रस्तुत शोध निबंधात मराठी साहित्याचे बदलते अभिव्यक्ति माध्यम या विषयावर आधारित नऊ संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. १)प्रसारमाध्यमांचा साहित्यावरील प्रभाव २)साहित्यकृतींचे माध्यमांतर ३) बदलते मराठी साहित्य व संस्कृती ४) प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा ५) सोशल मीडिया ६)नव्वदोत्तर मराठी साहित्य ७) नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा ८) नव्वदोत्तर मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा ९) सायबर संस्कृती. या ग्रंथाची समीक्षा करून संशोधन समसयेतील अंतर शोधण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

प्रत्येक अभिव्यक्तीचा आविष्कार हा कालनिबद्ध असतो. मुद्रण माध्यमातील अभिव्यक्त होणारे साहित्य असो, इलेक्ट्रॉनिक माध्यमातील अभिव्यक्त होणारे साहित्य असो किंवा आज समाज माध्यमांद्वारे अभिव्यक्त होणारे साहित्य असो, या सर्व माध्यमांमधून काळाचे पडसाद उमटत असतात किंवा काळानुरूप ही समाजमाध्यमे साहित्याच्या अभिव्यक्तीसाठीची निकड ठरली. हा परस्पर अनुबंध लक्षात घेऊन अभिव्यक्ती माध्यमांचे सर्वांगीण स्वरूप, महत्त्व, भाषा, तीव्रता आणि गरज तसेच परिणामकारकतेचा विचार समाज माध्यमांच्या परिप्रेक्ष्यात करणे, हे या संशोधनाचे उद्दिष्ट होय.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन साहित्य आढाव्यासाठी पद्धतीशीर तांत्रिक मार्गाने संदर्भ साहित्याचा आढावा (Systematic Literature Review ) घेतला जाणार आहे.सोशल मीडिया सुरू झाल्यापासून तर आतापर्यंतच्या संपूर्ण काळात झालेल्या संशोधन साहित्याचा समीक्षात्मक अभ्यास या शोधनिबंधात केला आहे. या सर्व साहित्याचे या शोधनिबंधात अन्वेषण, विश्लेषण आणि तार्किक पुनरवलोकन केले आहे.जे संशोधनाला न्याय देणारे ठरेल .

**साहित्य आढावा**

मराठी साहित्य ज्या माध्यमांतून वाचक रसिकांपर्यंत पोहचले ती माध्यमे काळानुसार बदलत गेली. अद्ययावत होत गेली ,आता तर जुन्या माध्यमांना नव्या मंचावर नवे रूप प्राप्त झाले आहे. या साहित्याच्या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर भूतकाळात झालेले लेखन संशोधनाच्या दृष्टीने तपासणे आणि त्यातील विषयाच्या दृष्टीने झालेले महत्त्वपूर्ण काम ,त्यातील उणिवांचा चिकित्सक

अभ्यास करणे तसेच त्या उणिवांचा आणि विषयाला धरून भविष्यात होऊ शकणारे आणि आवश्यक असणारे संशोधनाची अपरिहार्यता नोंदवल्या जाईल .या विषयाशी संबंधी साहित्य समीक्षा पुढील प्रमाणे -

१) **प्रसारमाध्यमांचा साहित्यावरील प्रभाव** –

या विषयावरील research journey या international research journal चा विशेषांक या विषयावरचे महत्त्वाचे संदर्भ साधन म्हणता येईल. यात प्रसारमाध्यमांचा मराठी साहित्यावर जो प्रभाव पडला आहे तो अनेक लेखकांच्या लेखातून विशेषत्वाने नोंदविला गेला आहे. यात साहित्याचे माध्यमांतर, इलेक्ट्रॉनिक माध्यमावरील साहित्याचा दर्जा, प्रसारमाध्यमांमुळे साहित्याच्या स्थिती गतीमध्ये झालेले बदल, प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य या उपविषयांवर लेखांच्या स्वरूपात वेगवेगळ्या लेखकांकडून लेखन झाले आहे. मराठी साहित्याच्या अभ्यासाच्या आणि संशोधनाच्या दृष्टीने यातील विषय महत्त्वपूर्ण आणि अद्ययावत आहेत.[१]

या अंकाची मध्यवर्ती कल्पना ही प्रस्तुत शोध विषयाच्या बीज स्वरूपात महत्त्वपूर्ण आहे, परंतु संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या सर्व मुद्द्यांना या अंकात हात घातला नाही, ही या अंकाची मर्यादा आहे. प्रस्तुत विषयावर वेगवेगळ्या लेखकांकडून विषयाच्या संदर्भात सर्वांगीण मुद्द्यांवर लेखन झाले असते तर विषयाला न्याय मिळाला असता प्रसार माध्यमांचा साहित्यावरील प्रभाव या विषयाला धरून सर्व मुद्दे या अंकात दिसत नाही. बदलत्या अभिव्यक्ती माध्यमांचा विषयही या अंकात दिसत नाही म्हणून या विषयाला धरून साहित्य संशोधनाच्या दृष्टीने हा अभ्यास करणे गरजेचे आहे.

२) **साहित्यकृतींचे माध्यमांतर -**

प्रकाशित मराठी साहित्यकृतींचे माध्यमान्तर या विषयाचे विविधांगी परिप्रेक्ष्यातून अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे . हा विषय संशोधन विषयाला जवळ जाणारा आहे.मराठी साहित्याची दृकश्राव्य माध्यमातून झालेली प्रस्तुती ही या ग्रंथाचा मध्यवर्ती विषय आहे.[२] कथा,कादंबरी, नाटक या साहित्यकृतींचे चित्रपटात झालेले रूपांतर हा या ग्रंथाचा मूळ आत्मा आहे.

संबंधित संशोधन स्त्रोतांचा मराठी साहित्याचे बदलते अभिव्यक्ती माध्यम या संशोधन विषयाशी संबंध आहे.मराठी साहित्याचे आजपर्यंतच्या इतिहासात बदललेले अभिव्यक्ती माध्यम बघताना दृकश्राव्य माध्यमांचा विचार अभिव्यक्ती माध्यमात महत्त्वाचा ठरतो. म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाची पार्श्वभूमी समजून घेण्यास हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. हा ग्रंथ प्रकाशित साहित्यकृतींचे माध्यमांतर याच विषयावर लक्ष केंद्रित करतो त्यामुळे आपल्या संशोधन विषयाची पार्श्वभूमी समजून घेताना या सोबतच समाजमाध्यमांसाठी, प्रसारमाध्यमांसाठी झालेले स्वतंत्र साहित्य लेखन आपल्याला या ग्रंथाव्यतिरिक्त समजून घेणे भाग पडते.

३) **बदलते मराठी साहित्य व संस्कृती** –

अविनाश पानसरे व्याख्यानमालेमध्ये गुंफलेले 'बदलते मराठी साहित्य व संस्कृती' या विषयाशी संबंधित मांडलेले चिंतन आणि साहित्य विचार हा या ग्रंथाचा विषय आहे. या ग्रंथात भाषणातून व्यक्त केलेले निरनिराळ्या साहित्यिकांचे आणि साहित्य क्षेत्रातल्या अभ्यासकांचे भाषण या ग्रंथात दिले आहे.

'मराठी साहित्य व संस्कृती' या नागनाथ कोत्तापल्ले यांच्या भाषणात इंटरनेट . संगणक . मोबाईल या तंत्रज्ञानावर आधारित असणाऱ्या जागतिकीकरणाचा परामर्श त्यांनी थोडक्यात घेतला असला तरी याचा साहित्यावर झालेला परिणाम त्यांच्या भाषणात येत नाही.[३] 'मल्टीमीडिया माहोलातील मराठी' या दिनकर गांगल यांच्या लेखाच्या आधारे '२१ व्या शतकात आजच्या साहित्य रसिकांना विजुअल भाषेत उपलब्ध होणारे साहित्य सहज आणि सोपी आहे' असा विचार आणि साहित्याच्या पुनर्रचनेची आजच्या काळानुसार गरज त्यांनी विशद केली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ताकद समजून न घेता मराठी साहित्य आणि संस्कृतीचा विचार केल्यास मराठी लेखक, अभ्यासक आणि संशोधक यांची कशी फसगत होऊ

शकेल याचे विवेचन त्यांनी या लेखात केले आहे.[४] अपरिहार्यपणे समोर आलेले हे तंत्रज्ञानाचे युग न स्वीकारता मराठी साहित्याचा विचार या दृष्टीने होऊ शकत नाही प्रस्तुत लेख हा मराठी साहित्याचे बदलते अभिव्यक्ती माध्यम या संशोधन विषयासाठी अतिशय महत्त्वाचा आणि बीज स्वरूप असल्याचे निदर्शनास येते . दिनकर गांगल यांनी बीज स्वरूपात मांडलेल्या या लेखाची हा संशोधन विषय म्हणजे संशोधनात्मक फलश्रुती होऊ शकेल असे म्हणता येईल.

राजन गवस यांनी दिलेल्या 'बदलत्या मराठी साहित्याची दिशा'[५] या भाषणात विसाव्या शतकाच्या शेवटी आणि एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात प्रभावी ठरलेल्या साहित्य बदलावर कुठलेही चिंतन प्रकट केलेले नाही ही या ग्रंथाची एक मोठी कमतरता म्हणावी लागेल.

### ४) प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा

प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा यांचा परस्पर संबंध या विषयावर झालेल्या चर्चासत्रातील प्रस्तुत विषयावर सादर केलेल्या शोधनिबंधांचा ग्रंथ म्हणून म्हणता येईल. या ग्रंथात प्रसारमाध्यमे म्हणजेच वृत्तपत्र, आकाशवाणी आणि दूरदर्शन या प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून मराठी भाषेविषयीचे चिंतन आणि संशोधन प्रस्तुत निबंधात आले आहे.[६] या ग्रंथाचा प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंध नसला तरी त्याची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा ठरतो. या ग्रंथात प्रसार माध्यमांवर असणाऱ्या मराठी भाषेचा वापर या विषयावरचे चिंतन आले आहे, म्हणजे समाज माध्यमांच्या आधीचे प्रसारमाध्यम हा संशोधनाचा आणि चर्चासत्राचा विषय होत असेल तर आपण अभ्यासात असलेल्या संशोधन विषयावर काळानुसार अभ्यास होणे फार गरजेचे वाटते.

### ५) सोशल मीडिया

प्रस्तुत ग्रंथ हा संशोधन विषयात माध्यमांशी संकल्पना आणि वेगवेगळ्या माध्यमांचे पार्श्वभूमी प्रकार वैशिष्ट्ये समजून घेण्यास उपयुक्त ठरतो. हा साहित्याशी निगडित असणारा संदर्भ ग्रंथ नसला तरी मराठी साहित्याच्या बदलत्या अभिव्यक्ती माध्यमाची ओळख करून घेण्यास हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आहे. सोशल मीडियावरील साहित्य या विषयावर या ग्रंथात कुठलेही भाष्य किंवा संकल्पना समजून घेण्यास वाव नाही.[७]

### ६) नव्वदोत्तर मराठी साहित्य

नव्वदोत्तर मराठी साहित्य हा डॉ.सत्यवान मेश्राम यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्ताने प्रकाशित केलेला गौरव ग्रंथ असून यात नव्वदोत्तर मराठी साहित्यामध्ये झालेले बदल नाटक कविता स्त्री जीवन, ग्रामीण, दलित, आदिवासी इत्यादी विषयांचा ऊहापोह करण्यात आला आहे[८] परंतु नव्वदोत्तर काळामध्ये उत्तर आधुनिकता वाद आणि जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून कुठल्याही स्वरूपात साहित्याच्या बदलत्या अभिव्यक्ती माध्यमावर भाष्य कुठल्याही लेखकाकडून झालेले दिसत नाही. ही या ग्रंथाची कमतरता म्हणावी लागेल.

### ७) नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा

वसंत सानप आणि गणेश मोहिते संपादित चर्चासत्रातील संदर्भ ग्रंथ म्हणून नव्वदोत्तर मराठी साहित्य चर्चा आणि मीमांसा या विषयावर संपादन झाले आहे,[९] परंतु या ग्रंथात नव्वदोत्तर मराठी साहित्यामध्ये जागतिकीकरण आणि आधुनिकीकरणांमध्ये तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव हा महत्त्वाचा भाग कुठेही दृष्टिक्षेपात येत नाही.

**८) नव्वदोत्तर मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा**

नव्वदोत्तरी मराठी साहित्य चिंतन आणि चिकित्सा या चर्चासत्रात राष्ट्रीय चर्चासत्रातील प्रकाशित अंकात निरनिराळ्या साहित्यकृतींवर आणि नव्वदोत्तर काळातील विषयावर चिकित्सकपणे विवेचन करण्यात आले आहे.या ग्रंथात समकालीन साहित्याचा अभ्यास करत असतानाच समकालीन साहित्याच्या अभिव्यक्तीच्या माध्यमावर म्हणजेच सोशल मीडियावरसुद्धा एका लेखाच्या माध्यमातून पल्लवी ताजने या लेखिकेकडून भाष्य करण्यात आले आहे.[१०]

**९) सायबर संस्कृती**

सायबर संस्कृती हा रमेश नारायण वरखेडे यांनी लिहिलेला तांत्रिक विश्वावरील एक महत्त्वपूर्ण पुस्तक आहे. मराठी साहित्याच्या लेखकाने लिहिलेले हे अतिशय तांत्रिक लिखाण आहे. प्रस्तुत संशोधन विषयाची समाज माध्यमाची संकल्पना समजून घेण्यासाठी आणि विविध समाज माध्यमांच्या तांत्रिक गोष्टी त्याचे उपयोग, गुण दोष समजून घेण्यासाठी हा ग्रंथ संदर्भ ग्रंथ म्हणून अतिशय उपयुक्त आहे, परंतु सायबर संस्कृतीमध्ये वाचन संस्कृतीचा कुठलाही वाचन संस्कृती आणि लेखन संस्कृतीशी संबंधित कुठलाही ऊहापोह प्रस्तुत लेखकाने केलेला नसल्याने हा विषयाच्या मध्यवर्ती कल्पनेला धरून असलेला ग्रंथ नाही असे म्हणावे लागते. परंतु समाज माध्यमांची संकल्पना समजून घेण्यासाठी हे अतिशय उपयुक्त पुस्तक ठरू शकते.

**विश्लेषण -**

प्रस्तुत विषयावरील साहित्य आढाव्यातून स्पष्ट होते की, माध्यमांमध्ये झालेला ऐतिहासिक व तांत्रिक बदल साहित्याच्या निर्माण, प्रसार आणि प्रभाव यामध्ये मोलाची भर घालतो.परंतु हे सर्व साहित्य प्रस्तुत विषयावरील परिपूर्ण संशोधन नाही. मराठी साहित्याचे बदलते अभिव्यक्ती माध्यम आणि आताचे प्रचलित तसेच अपरिहार्य अभिव्यक्ती माध्यम यावर विस्तृत संशोधन होण्यास वाव आहे. या संशोधन विषयांतर्गत परंपरा व नवता या दोन्हीचा परामर्श घेता येईल पण विशेषतः नवतेचे चिकित्सक विश्लेषण करता येईल.

आधुनिक डिजिटल माध्यमासंदर्भात प्रसार माध्यमे,पत्रकारिता, राजकीय, सामाजिक, आर्थिक परिणामांच्या आणि उपयोगितेच्या दृष्टिकोनातून संशोधनाची नवी दलाने खुली झाली आहे. परंतु या नव्या माध्यमांवरील साहित्याबाबत म्हणावे तसे संशोधन झाले नाही. काही परदेशी भाषांमध्ये असे संशोधन झालेले दिसते. त्याच बदललेल्या माध्यमांच्या परिप्रेक्ष्यातून मराठी साहित्याच्या अभिव्यक्तीकडे संशोधनाच्या दृष्टीने बघणे गरजेचे आणि अपरिहार्य आहे.

**मर्यादा** –

प्रस्तुत संशोधन साहित्यात एक महत्त्वाची उणीव दिसते ती म्हणजे, या सर्व साहित्यात कोठेही समाज माध्यमांचा मराठी साहित्य अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून संशोधनात्मक दृष्टीने विचार यात केला गेला नाही. संशोधनात समाज माध्यमांच्या एकंदर सर्वांगीण विषयावर लक्ष केंद्रित केल्या गेले असले तरी या विशिष्ट विषयावर लेखांद्वारे मर्यादित आणि तुरळक लक्ष दिल्या गेले. ही मर्यादा लक्षात घेऊन संबंधित विषयावरील संशोधनाला वाव आहे.

**भविष्यातील संशोधन -**

प्रस्तुत संशोधन विषय साहित्य आणि मराठी भाषा अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. एकविसाव्या शतकात आधुनिकीकरण,जागतिकीकरण आणि तांत्रिक युगात सर्व क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे. त्यामुळे मराठी भाषा आणि साहित्य क्षेत्रावर झालेले परिणाम आणि बदलाची गतिमानता मोठी आहे. साहित्याचा अभ्यास होण्यासाठी पूर्वी काही वर्षांचा काळ जावा लागत असे. भाषा आणि साहित्यात झालेले बदल अभ्यासणे त्यानंतर शक्य होत असे, पण एकविसाव्या शतकात काळ झपाट्याने पुढे जात आहे. त्याचे कारण म्हणजे तांत्रिक युगाचा प्रभाव होय.या काळात जसे साहित्यातील विषयात बदल झाले तसे साहित्याच्या माध्यम बदलाचे हे युग असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. त्यामुळे या बदललेल्या

माध्यमाचा, त्यांच्या प्रभावीपणाचा, सकारात्मक आणि नकारात्मक पैलूचा अभ्यास साहित्याच्या परिप्रेक्ष्यातून महत्त्वाचा ठरतो.मराठी साहित्याच्या माध्यम बदलाच्या या अभ्यासातून समाज माध्यमांच्या मंचावर प्रकाशित होणाऱ्या साहित्याची अपरिहार्यता, पारंपारिक अभिव्यक्ती माध्यमाच्या उपयुक्ततेत पडलेला फरक आणि त्यातून साहित्याच्या दर्जा पडलेला फरक तपासता येईल.

## संदर्भ –


1 'प्रसारमाध्यमांचा साहित्यावरील प्रभाव' Research Journey, Multidisciplinary International E-Research Journal,ISSN-2348-7143

2 'साहित्यकृतींचे माध्यमांतर', संपादक डॉ. राजेंद्र थोरात ,प्रा. आशुतोष कसबेकर,संस्कृति प्रकाशन,आयएसबीएन 978-93-84497-67-5

3 संपादक,प्रा. विलास रणसुभे,बदलते मराठी साहित्य व संस्कृती,श्रमिक प्रतिष्ठान,कोल्हापूर पहिली आवृत्ती : सप्टेंबर, २०१३ ISBN 978-93-82888-00-0

4 संपादक,प्रा. विलास रणसुभे,बदलते मराठी साहित्य व संस्कृती,श्रमिक प्रतिष्ठान,कोल्हापूर पहिली आवृत्ती : सप्टेंबर, २०१३ ISBN 978-93-82888-00-0

5 संपादक,प्रा. विलास रणसुभे,बदलते मराठी साहित्य व संस्कृती,श्रमिक प्रतिष्ठान,कोल्हापूर पहिली आवृत्ती : सप्टेंबर, २०१३ ISBN 978-93-82888-00-0

6 शेळके.डॉ. भास्कर , प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा,स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे प्रथमावृत्ती २५ एप्रिल २०१२, ISBN 978-81-89634-93-3

7 बोराटे;योगेश,सोशल मीडिया, अथर्व पब्लिकेशन, धुळे प्रथमावृत्ती १ मे २०१९ ISBN : 978- 93-88544-52-8

8 कुळकर्णी अजय आणि इतर संपादक,नव्वदोत्तर मराठी साहित्य,प्रा. सत्यवान मेश्राम गौरवग्रंथ, विजय प्रकाशन ,नागपूर-१४ जानेवारी २०१८

9 सानप , वसंत आणि मोहिते, गणेश संपादक, नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा

10 शास्त्री ,जयश्री संपादक ,नव्वदोत्तर मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा ,scholarly research journal for interdisciplinary studies ,an international peer reviewed journal,Impact Factor (SJIF)2021-7.380 ISSN 2319-4766,APRIL -JUNE,2021,VOL-10,ISSUE-55